|| श्री ||

# साईकृपा को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.

नोंदणी क्रमांक : एनबिओएम/सिडको/एचएसजी (ओएच) ७५० / जाटीआर सन -१९९८-९९

ए. टाईप, कंडोमिनीयम नं-६, सेक्टर - ९, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९.

---

संदर्भ क्र. साई २६/८६        दिनांक : 31/07/26

प्रति,
साई कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.
सर्व सभासद,

<u>विषयः विशेष सर्वसाधारण सभा(पुनर्विकास) १६/०८/२०२६</u>
<u>पुनर्विकास निविदा सादरीकरण व तांत्रिक बोली उघडण्याबाबत माहिती</u>

आदरणीय सभासद,

आपल्याला कळविण्यात येते की,पुनर्विकास प्रक्रियेचा एक भाग म्हणून, संस्थेने दिनांक **०३ जून २०२६** रोजी **टाईम्स ऑफ इंडिया** (Times of India) **आणि महाराष्ट्र टाईम्स** (Maharashtra Times) या वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिद्ध करून नामांकित विकासकांना निविदा कागदपत्रे घेण्यासाठी आमंत्रित केले होते. निविदा कागदपत्रे दिनांक ०३ जून २०२६ ते १८ जून २०२६ या कालावधीत दररोज सायंकाळी ०७:०० ते ०९:०० या वेळेत संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली होती. तसेच निविदा भरणा करण्याची अंतिम दिनांक २८ जून २०२६ ही होती, या तारखेपर्यंत ०७ नामांकित विकासकांनी संस्थेच्या कार्यालयातून निविदा कागदपत्रे विकत घेतलीत, यापैकी ०३ विकासकांनी २८ जून २०२६ पर्यंत सीलबंद निविदा कार्यालयात सादर केल्यात. हा मिळालेला कमी प्रतिसाद, लक्षात घेता, व्यवस्थापन समितीने पुन्हा निविदा विकत तसेच निविदा भरण्याची दिनांक १५ जुले २०२६ पर्यंत वाढवीत, जाहिरात **टाइम्स ऑफ इंडिया** (Times of India), **महाराष्ट्र टाईम्स** (maharashtra Times), **द इंडियन एक्सप्रेस** (The Indian express) **आणि लोकसत्ता** (Loksatta) अश्या ४ वर्तमान पत्रात, ०१ जुले २०२६ देण्यात आली.**१५ जुले** अखेरीस एकूण **०८ नामांकित विकासकांनी** संस्थेच्या कार्यालयातून निविदा कागदपत्रे घेतली.

**१५ जुले २०२६रात्री ०९:०० वाजेपर्यंत खालील विकासकांकडून पुनर्विकास सीलबंद निविदा प्राप्त झाल्या आहेतः**

1. **इव्ही होम्स कन्स्ट्रक्शन प्रा. लि.(वाशी)**

2. **पॅराडाईज इन्फ्रा.**

3. **के टी होम्स्**

4. **साई प्रोविसो**

5. **गामी ग्रूप**

वरील विकासकांच्या **तांत्रिक बोली** (Technical Bid) **१६/०८/२०२६** रोजी **सकाळी ११.३० वाजता** वार्षिक सर्वसाधारण सभा संपल्यानंतर उघडण्यात येणार असल्याची माहिती सर्व सभासदांना देताना आम्हाला आनंद होत आहे.

फक्त तांत्रिक बोलीमध्ये पात्र ठरणाऱ्या बोलीदारांचीच पुढील टप्प्यात **आर्थिक बोली** (Financial Bid) उघडण्यात येईल.
ही प्रक्रिया आपल्या सोसायटीच्या पारदर्शक व यशस्वी पुनर्विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

**धन्यवाद.**

**साई कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.**

Masane

**आपला विश्वासू,**

साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
नोंदणी क्रमांक :
एनबीओएम/सिडको/
एचएसजी (ओएच)/७५०/
जेटीआर/सन १९९९
नवी मुंबई-४०० ७०९